Impact Factor 5.307 (SJIF)
RESEARCH HUB
International Peer-Reviewed Multidisciplinary E-Journal
ISSN 2582-9173

# कालच्या आणि आजच्या स्त्रियांच्या समस्या

**प्रा. डॉ. किशोर बी. कुडे**
फुले – आंबेडकर कॉलेज ऑफ
सोशल वर्क, गडचिरोली
ई–मेल : gojirikude@gmail.com
मो. नं. : ८२७५५५३४८०

---

***सारांश :***

*स्त्रिला आदिशक्ती म्हणुन संबोधल्या जाते. परंतु पुर्वी स्त्रि निरीक्षर, कमी शिकलेली असे. फक्त पुरुष प्रधान संस्कृतीमध्ये पुरुषांनी सांगीतलेली कामे करणे हेच तीचे कर्तव्य होते. परंतु सामाजिक चळवळी, समानतेसाठी अनेक प्रयत्नातुन स्त्रियांच्या सक्षमीकरीता प्रयत्न केले आणि बऱ्याच प्रमाणात यशसुध्दा प्राप्त झाले. आज स्त्रि ही पुरुषांच्या बरोबरीने कार्य करतांना नोकरी, व्यवसाय अनेक उपक्रमामध्ये सहभागी होताना दिसुन येते. परंतु, स्त्रि ही सुशिक्षीत शिकलेली असतानासुध्दा अनेक समस्यांना तोंड द्यावा लागत आहे.*

---

**प्रस्तावना :**

स्त्री–पुरूष दर्जावर चर्चा करणार नसून स्त्रियांना त्यांच्या जीवनात ज्या विविध समस्यांना किंवा प्रश्नांना सामोरे जावे लागते त्यावर विवेचन करणार आहोत. भारतीय राज्यघटनेने, वैधानिक दृष्टीने स्त्री–पुरूष समानतेचे तत्व मान्य केले असते तरी सांस्कृतिक जीवनात आणि व्यावहारिक जीवनात स्त्रियांचा दर्जा हा पुरूषांपेक्षा नेहमीच कनिष्ठ कमी प्रतीचा राहिल्याचे दिसून येते. सर्वच धर्मीयांनी स्त्रियांचे कार्यक्षेत्र हे स्वयंपाक घर व घरापुरतेच मर्यादित ठेवले. पुरूषाने कमवावे आणि स्त्रिने त्याने कमविलेल्या उत्पन्नातून घरखर्च भागवावा. महात्मा गांधी सुद्धा असे म्हणतात की हातात तलवार घेउन, घोडा दौडविण्याचे कार्य जेव्हा एखादी स्त्री करते तेव्हा ती स्वत:ला आणि समाजाला मान खाली घालावयास लावते. याचा अर्थ महात्मा गांधी स्त्री–पुरूष समानता मानत नव्हते असा नाही. परंतु स्त्रियांची काही कार्ये पुरूषापेक्षा वेगळी आहेत. स्त्री–पुरूष यांचे जीवन परस्परपूरक असले तरी निसर्गाने मातृत्वाची जबाबदारी स्त्रीवर टाकली व ती निभावण्यासाठी तिने घरात राहूनच आपल्या मुलांचे संगोपन करावे. पारंपारिक दृष्टीने विचार करता “स्त्री” चा दर्जा काही बाबतीत पुरूषापेक्षा कनिष्ठ होता. हिंदू धर्माचा विचार करता हिंदूचा ‘स्त्री’ कडे पाहण्याचा दृष्टिकोण दोन प्रकारचा आहे. “माता” म्हणून स्त्री नेहमीच वंदनीय आहे. मातेच्या स्वरूपात आम्ही स्त्रीची पूजा बांधली. तिचे गोडवे गाईले. पण ‘पत्नी’ म्हणून मात्र आम्ही नेहमीच स्त्रीला कनिष्ठ मानले व तिची उपेक्षा केली. याचेही कारण पारंपारिक धार्मिक दृष्टिकोनात आहे.

नवऱ्याच्या हुकूमशाही विरूद्ध तक्रार कोणाकडे करावयाची व ती ऐकणार कोण. “तोंड दाबून बुक्याचा मार” या म्हणीप्रमाणे नवऱ्याचे अन्याय अत्याचार सहन करत राहावयाचे.

स्त्रियांच्या समस्येचा उगम हा प्रामुख्याने त्यांच्यावर पुरूषांकडून होणाऱ्या अत्याचारात आहे. हे अत्याचार स्त्रीवर तिचा पिता, पती, भाऊ, सासरा, दीर व अन्य पुरूष नातेवाईक यांच्याकडून केले जातात व त्याला साथ देण्याचे कार्य त्या स्त्रीची सासू, ननंद, वडील जाऊ इत्यादी स्त्रिया करतात. आपल्या सुनेवर अत्याचार करताना आपली मुलगी पण कोणाचीतरी सून होणार आहे हे संबंधित व्यक्ती विसरतात.

**स्त्रियांवरचे अत्याचार :**

स्त्रियांवर अत्याचार करणे वा त्यांचा छळ करणे हा प्रश्न अतिप्राचीन आहे. अगदी पारंपारिक पौराणिक साहित्याकडे दृष्टिक्षेप टाकला तर असे लक्षात येते की स्त्रियांवरचे अत्याचार हे प्राचीन हिंदू धर्मात धर्म संमत मानल्याचे दिसते.

महाभारतात पांडव द्युतात हरल्यामुळे त्यांची पत्नी द्रौपदी कौरवांनी जिंकली. ती एकवस्त्रा असताना तिला भरदरबारात आणून सर्व श्रेष्ठ, ज्येष्ठ सदस्यांसमोर तिचा विनयभंग केला. तिच्या विनवणीला प्रतिसाद देण्याचे धाडस कोणीही दाखविले नाही. पत्नीला द्युतात पणाला लावले. याचाच अर्थ पत्नी पतीची मालमत्ता आहे. असे सूचित करते.

वरील उदाहरणावरून असे लक्षात येईल की स्त्रियांचा छळ करण्याची पुरूषाची प्रवृत्ती हे फार जुने दुखणे आहे. भारतीय समाजात स्त्रियांना अपमानित करणे, त्यांना विविध प्रकारच्या यातना देणे व त्यांचे विविध मार्गाने शोषण करणे यांच्या त्या बळी ठरत आहेत. आज जरी सर्वक्षेत्रात स्वत:ची ताकद, स्वत:चे कतृत्व सिद्ध करून स्त्रियांच्या जीवनालाही काही अर्थ असतो हे दाखवून दिले असले तरी, केवळ दोन दशकापूर्वी त्यांची म्हणजे स्त्रियांची स्थिती दयनीय होती. आज जरी स्त्रिया सर्व क्षेत्रात प्रगती करत असल्या तरी त्यांच्या संबंधीच्या परंपरेने चालत आलेल्या विचारप्रणालीत, संस्थात्मक प्रथा आणि प्रचलित नियम याचा समाजमनावर इतका प्रचंड पगडा आहे. की संधी मिळाली की पुरूष स्त्रीचा विनयभंग करतो. स्त्रियांना संरक्षण देणारे अनेक कायदे आज अस्तित्वात असले तरी स्त्री विरूद्ध होणाऱ्या गुन्ह्याचे प्रमाण कमी होण्याऐवजी वाढतच आहे. स्त्री विरूद्ध होणाऱ्या गुन्ह्याचे अंतिमत: हिंसाचारात रूपांतर होते. स्त्रिया, ज्या प्रकारच्या पुरूषी अत्याचाराला व हिंसाचाराला सामोरे जातात. त्यात प्रामुख्याने मारहाण करणे, पळवून नेणे, बलात्कार करणे, जाळून टाकणे व खून करणे इत्यादीचा समावेश होतो.

**स्त्रियावरचे अत्याचार अर्थ :**

स्त्रियांवर होणाऱ्या अत्याचाराचे किंवा जबरदस्तीचे स्वरूप इतके व्यापक आहे की त्याला व्याख्येच्या चौकटीत बसविणे अत्यंत अवघड आहे. तरीही तसा प्रयत्न काही विद्वानांनी केला असून त्यांनी अत्याचाराच्या केलेल्या व्याख्या आपण मांडू.

**गेलेस** (Gelles) : अत्याचार (Violence) म्हणजे पुरूष व्यक्तींची अशी कृती की जी स्त्रीला त्रास होईल, ती जखमी होईल हा हेतू डोळ्यासमोर ठेवून केली जाते. पण प्रत्यक्षात मात्र तसे करण्याचे टाळले जाते. याचाच थोडक्यात अर्थ असा की ठार मारण्याची, जखमी करण्याची धमकी देउन तिच्यावर जबरदस्ती करणे होय.

**मेगार्मी** (Megargee) : मेगार्गी यांनी अत्याचाराची व्याख्या करताना असे म्हटले आहे की "अत्याचार म्हणजे एका व्यक्तीने व (पुरूषाने) राजरोसपणे दुसऱ्या व्यक्तीला (स्त्रीला) धमकी देणे किंवा राजरोसपणे स्वत:च्या शक्तीचा अशा हुशारीने वापर करणे की ज्याचा परिणाम प्रामुख्याने त्या दुसऱ्या व्यक्तीचे नुकसान होण्यात वा त्या व्यक्तीच्या नावलौकिकास वा प्रतिष्ठेस धक्का लागण्यात होतो.

**केम्पे** (Kempe) : 'अत्याचार' ही संज्ञा या समाजशास्त्रज्ञाने पुढील अर्थाने वापरली आहे. त्याच्या मताने अत्याचार म्हणजे एका व्यक्तीने दुसऱ्या व्यक्तीवर शारीरिक हल्ला करून तिला जखमी करणे होय.

अत्याचार प्रक्रियेत दोन पक्ष प्रामुख्याने असतात. एक अत्याचार करणारा व दोन अत्याचार सहन करणारा. स्त्रियांवर होणाऱ्या अत्याचारात अत्याचार करणारा घटक हा मुख्यत्वेकरून पुरूष असतो व स्त्री त्यात जर सहभागी असेल तर केवळ एक मदतनीस म्हणून उदा. स्त्रीवर बलात्कार करण्याचे काम पुरूष करतो. परंतु बलात्कारी स्त्रीला फसवून त्या विशिष्ट ठिकाणी आणण्याचे काम मात्र एखादी स्त्री करते. भारतात स्त्रियांवरील अत्याचाराचे प्रमाण सतत वाढत असून, तिच एक मोठी समस्या बनत आहे.

**स्त्रियांवरील अत्याचाराचे प्रकार :**

गुन्हेगारी स्वरूपाचे अत्याचार : बलात्कार, पळवून नेणे, खून करणे

घरगुती स्वरूपाचे अत्याचार : हुंडाबळी, पत्नीला मारणे, स्त्री लिंग गर्भपात

**'भारतीय दंड संहिते'** अंतर्गत घडलेले स्त्री संबंधी गुन्हे यात सात प्रकारचे गुन्हे येतात. बलात्कार, पळविणे वा पळून जाणे, हुड़यांसाठी वधू हत्या, शारीरिक व मानसिक दृष्टया स्त्रीला सतावणे, स्त्रियांना उपद्रव देणे, अल्पवयीन मुलींना सतावणे, एकविसव्या वर्षापर्यंतच्या मुलींची परदेशातून वा परप्रांतातून आयात करणे. स्थानिक आणि विशेष कायद्यानुसार घडलेले स्त्री विषयक अपराध यात चार प्रकारचे गुन्हे येतात. सतीचे अधिकार पत्र घेण, हुंडा प्रतिबंध, अनैतिकासाठी मुलींचा व्यापार आणि स्त्री समोर असभ्यतेचे प्रदर्शन करणे.

बलात्कार हा केवळ गरीब कुटूंबातील मुलींवरच होतो असे नाही. तर मध्यम वर्गातील नोकरी करणाऱ्या स्त्रियादेखील त्यांच्या मालकांकडून होणाऱ्या शारीरिक अपमानास्पद वागणुकीच्या किंवा विनयभंगाच्या बळी ठरतात. जेलमध्ये राहणाऱ्या कैदी स्त्रियांवर जेल अधिक्षकांकडून बलात्कार केला जातो. 'स्त्री' गुन्हेगार पोलिसांकडून होणाऱ्या बलात्काराच्या बळी ठरतात. 'स्त्री' रोगी दवाखान्यातील पुरूष कर्मचाऱ्यांकडून होणाऱ्या बलात्काराची शिकार बनतात. मोलकरणीवर तिच्या मालकाकडून बलात्कार केला जातो. रोजंदारीवर काम करणाऱ्या स्त्रिया या ठेकेदार यांच्या कडून होणाऱ्या बलात्काराच्या शिकार बनतात. बहिऱ्या मुक्या स्त्रिया, मनोरूग्ण स्त्रिया, आंधळ्या स्त्रिया आणि भिकारी स्त्रिया पण पुरूषापासून होणाऱ्या बलात्कारापासून वाचलेल्या नाहीत. मध्यम वर्गातील स्त्रिया की ज्या कुटूंबाच्या उपजीविकेसाठी (एकतर गरिबीमुळे किंवा पती निधनामुळे) नोकरी वा अन्य काम करतात अशा स्त्रियाही पुरूषांच्या वासनेच्या शिकार बनतात.

जर या स्त्रियांनी त्यावर होणाऱ्या बलात्काराविरूद्ध तक्रार करण्याचा प्रयत्न केला तर बलात्काराला बळी पडलेल्या या स्त्रियांना सामाजिक, बदनामीला, सामाजिक कलंकाला (की जी पुरूषांकडून केली जाते.) तोंड द्यावे लागते. अशा बलात्काराच्या शिकार बनलेल्या स्त्रियांना त्यांनी फार मोठा अपराध केला आहे. अशी अपराधाची व वेदनेची तीव्र भावना या स्त्रियांच्या मनात वसत असते व त्याचा परिणाम त्यांचे वैयक्तिक विघटन होण्यात होतो. अनेक बलात्कारित स्त्रिया जीवन जगणे असहय झाल्यामुळे आत्महत्यासुद्धा करतात.

**अपहरणाची आणि पळवून नेण्याची समस्या :**

स्त्रियांना सामोरे जावे लागणारी महत्वपूर्ण सामाजिक समस्या म्हणजे त्यांचे केले जाणारे अपहरण होय. अपहरण याचा अर्थ असा की अल्पवयीन कायद्यानुसार १८ वर्षाखालील मुलगी व १६ वर्षाखालील मुलगा अल्पवयीन या संज्ञेला पात्र ठरतात. अल्पवयीन मुलांना त्यांच्या मातापित्याची वा कायदेशीर पालकांची परवानगी न घेता स्वत:च्या लोभासाठी किंवा स्वार्थासाठी काहीतरी आमिष दाखवून स्वत: बरोबर घेउन जाणे होय. अपहरणात मुलाला प्रलोभन दाखविण्याची लालूच दाखविल्यानंतर मुलगा स्वत:हून त्या व्यक्तीबरोबर जाण्यास तयार होतो.

पळवून नेण्याच्या क्रियेत पळवून नेणारी व्यक्ती एखाद्या मुलीला जबरदस्तीने, कपटाने किंवा दगाबाजी करून स्वत:बरोबर घेउन जाते. मुलीला पळवून नेण्याचा उद्देश तिला अनैतिक शारीरिक संबंध प्रस्थापित करून वाममार्गाला लावणे किंवा तिच्या इच्छेविरूद्ध तिचे लग्न लावून देणे हा असतो.

**हुंडाबळीची समस्या :**

आज सुशिक्षित असो वा अशिक्षित स्त्रीला ज्या प्रमुख समस्येचा सामना करावा लागतो तो हुंडाबळी जाण्याच्या समस्येचा होय. हुंडाबळी हे सर्व सामान्यपणे दोन प्रकाराने घेतले जातात. एक नवोदित वधूला किंवा सुनेला इतके छळावयाचे की त्या छळाला घाबरून तिने आत्महत्या करावी. दोन नवोदित वधूला लोभी पती आणि पतीचे नातेवाईक सासू, सासरे, दीर, जाउ, ननंद इत्यादीचा समावेश होतो. हे तिचा खून करतात.

पतीचे आणि त्याच्या नातेवाईकांच्या या अमानुष कृत्याचा संबंध त्या मुलीचे माता, पिता, कायदा तयार करणारे, पोलिस, न्यायालय व एकूण समाज यांच्याशी येतो या सर्वांची या अमानुष कृत्याकडे डोळेझाक करण्याची प्रवृत्ती या सारखी कृत्यात वाढ होण्यास कारणीभूत होतात.

**विधवा स्त्रियांच्या समस्या :**

विधवांना सामाजिक आर्थिक आणि भावनात्मक समायोजनाच्या समस्यांना तोंड द्यावे लागत असले तरी त्या समायोजन प्रक्रियेत फरक आहे. आपल्या मुलांची काळजी घेत त्यांना मोठे केलेले असते. आता वैधव्यानंतरही ती आपल्या मुलाच्या कुटूंबात नातवांची देखभाल करणे, सुनेच्या गैरहजरीत स्वयंपाक करणे, सुनेची बाळंतपणे करणे इत्यादी कामे ती करीत असल्यामुळे तिला मान मिळतो.

विधवेकडे पाहण्याचा समाजाचा दृष्टिकोण हा पूर्वग्रहीत स्वरूपाचा असतो. समाजाच्या सांस्कृतीक, सामाजिक व धार्मिक समारंभात विधवांना भाग घेण्यास आजही मज्जाव आहे. विधवा जर तरूण असेल तिला स्वत:चे स्वत्वही नसते व स्वत:ची प्रतिष्ठाही नसते. आधुनिकीकरणामुळे विधवा स्त्रियांकडे पाहण्याचा दृष्टिकोनात उदारता आली असली तरी विधवांची समाजातील एकूण स्थिती समाधानकारक आहे असे म्हणता येणार नाही.

संजयगांधी निराधार निवृत्त वेतन योजना, कुटुंब सेवानिवृत्त वेतन योजना सारख्या उपायांनी विधवा स्त्रियांना काही आर्थिक आधार दिला असला तरी मुलांकडून आणि सुनेकडून त्यांची अपेक्षा व त्यामुळे जगावे लागणारे एकाएकी जीवन हा आजच्या विधवा स्त्रियांसमोरचा महत्वाचा भावनिक प्रश्न होय. जर आपण विधवांच्या समस्येचा एकत्रित विचार केला तर विधवा स्त्रियांना देखील इतर अन्य स्त्रियाप्रमाणेच खालील प्रकारच्या अत्याचाराला सामना करावा लागतो. यात नातेवाईकांकडून मारहाण, भावनात्मक दुर्लक्ष व अपमान, शिवीगाळ, शारीरिक विटंबना, कायदेशीर मालमत्तेतील तिच्या वाट्यापासून तिला वंचित करणे व तिच्या मुलांकडे दुर्लक्ष करून त्या मुलांनाही शिवीगाळ करणे इत्यादींचा समावेश होतो.

**बालविवाहाची समस्या :**

"बालविवाहाची" समस्या आज पूर्वीइतकी गंभीर राहिली नसली तरी ती पूर्णपणे नष्ट झाली आहे असे म्हणता येणार नाही. इ. सन १९५५ साली भारत सरकारने मंजूर केलेल्या **"हिंदू विवाह कायद्यानुसार"** मुलाचे विवाहाचे वय २१ वर्षेपूर्ण तर मुलीचे विवाहाचे वय १८ वर्षे निर्धारित केले आहे. मुस्लिम समाजात विवाह हा करार असल्याने त्यात सुद्धा असे म्हटले आहे. की "प्रत्येक मुस्लिम व्यक्ती की तिचे स्वास्थ्य उत्तम आहे. आणि जिने तारूण्यात प्रवेश केला आहे. विवाहाचा करार करण्यास योग्य मानतात. भारतीय ख्रिस्ती विवाह कायद्यानुसार विवाहाचे वय मुलासाठी २१ व मुलीसाठी १८ वर्षे पूर्ण निर्धारित केले आहे.

बालविवाहातून निर्माण होणाऱ्या समस्या किंवा बालविवाहाचे परिणाम : वधू वराच्या वयात अधिक अंतर, माता व बालमृत्यूच्या प्रमाणात वाढ, बालविधवांच्या प्रमाणात वाढ,

**परित्यक्ता स्त्रियांच्या समस्या :**

परित्यक्ता स्त्री म्हणजे नवऱ्याने टाकून दिलेली स्त्री होय. काही काही वेळा नवरा क्षुल्लक कारणाने पत्नीला घरातून हाकलून देतो अशी स्त्री पण परित्यक्ता म्हणता येईल. या प्रसंगात पती—पत्नीचा त्याग करण्याची क्रिया म्हणजे त्यादोन व्यक्तीपुरता कायद्याची संमती नसलेला. परंतु स्वयंनिर्णित असा विवाह विच्छेद होय. या स्वयंनिर्णित विवाहविच्छेदात पती हा विच्छेद पत्नीला मान्य आहे की नाही याचा विचार न करता तिचा त्याग करतो. पत्नीच्याबद्दल काही कारणाने तिरस्कार निर्माण झाला की पतीला तिच्या सहवासाचा कंटाळा येतो व त्यातून तो तिला टाकून देतो किंवा हाकलून देतो. सर्व सामान्य पुरूष स्त्रीला खालील कारणांमुळे हाकलून देतो वा तिचा त्याग करतो.

**कुटुंबविघटनाला कारणीभूत असलेली काही प्रमुख कारणे :**

स्त्री– पुरूष शारीरिक संबंधातील उणिवा, सासरच्या लोकांतर्फे होणारा छळ, 'स्त्री चा कनिष्ठ दर्जा, स्त्री चा वांझपणा/सतत मुलीचा जन्म, मुलामुलीकडे होणारे दुर्लक्ष, पत्नीचे वा पतीचे मनोरूग्ण, आत्यंतिक दारिद्रय अथवा गरीबी, पुरूषांचा स्वच्छंदीपणा

**मिळवत्या स्त्रियांचे समस्या :**

व्यवसाय करणाऱ्या स्त्रिया, नोकरी करणाऱ्या स्त्रिया, रोजंदारीवर काम करणाऱ्या स्त्रिया, मुलांकडे व पतीकडे दुर्लक्ष होण्याची भीती, सण, समारंभ, उत्सव यांना फाटा देण्याची समस्या, नातेवाईकांकडून "अपेक्षा व उपेक्षा", पुरूष कर्मचाऱ्यांच्या बुभुक्षित नजरा टाळण्याची समस्या, शारीरिक संबंधाबाबत उदासीनता व घृणा निर्माण होण्याची क्षमता, योग्य वैवाहिक साथीदार निवडण्याची समस्या, नोकरीत बढती न होण्याची समस्या, शेतमालक, मुकादम, यांच्या कडून लैंगिक छळाची समस्या.

**समारोप :**

स्त्रियांकडे पाहण्याच्या दृष्टिकोनात जोपर्यंत बदलणार नाही तोपर्यंत त्यांच्या नोकरी, व्यवसाय, उद्योगात वाढ होणार नाही. तसेच कडक कायदे करुन चालणार नाही तर स्त्री–पुरुष समानता या दृष्टीकोनामध्ये बदल होण्याची गरज आहे. त्यांना प्रोत्याहीत करणे त्यासुध्दा कुटूंबातील, समाजातील महत्वाचा घटक आहेत. फक्त शिक्षण देणे प्रोत्साहित करणे यावरच निर्भर न राहता मानसिक आधार देणे सुध्दा पुरुषाची गरज आहे.

**संदर्भ :**


- भारतीय सामाजिक समस्या : प्रा. पी. के. कुळकर्णी, श्री. प्रमोद मुंजे, विद्या प्रकाशन, रूईकर रोड,नागपूर–४४०००२
- भारतीय सामाजिक समस्या : प्रा. डॉ. सुनिल मायी, गुणवंत मोहाडीकर अंकुल पब्लिकेशन्स, नागपुर
- भारतीय सामाजिक समस्या : प्रा. सौ. सुमन पाटे, श्रीपाद मुंजे , विद्या प्रकाशन, रूईकर रोड,नागपूर–४४०००२
- भारताच्या विघटनात्मक समस्या, डॉ. दा. धो. काचोळे, श्री. के. एस. अतकरे, कैलास पब्लीकेशन, औरंगाबाद


Research Hub International Journal